ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक ३०१ • शनिवार दि.२९ ऑगस्ट २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

## मनोज जरांगे पाटलांच्या उपोषणाला सुरुवात

### आता माघार नाही;समर्थकांची उपोषणस्थळी गर्दी



जालना : मराठा समाजाला ५८ लाख कुणबी जातीच्या नोंदीच्या आधारे जात प्रमाणपत्र दिल्याशिवाय आता माघार घेणार नाही. गरज पडली तर मुंबईला जावू असा इशारा देत मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आजपासून पुन्हा आपल्या उपोषणाला सुरुवात केली आहे. या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी शेकडो मराठा बांधव आंतरवाली सराटी गावात दाखल झाले असून पोलिसांचा कडक बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

मराठा आरक्षणासाठी लढा देणारे मनोज जरांगे पाटील यांनी शनिवार, २९ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता अंतरवाली सराटी येथे पुन्हा उपोषणाला सुरुवात केली आहे. उपोषण सुरू करण्यापूर्वी जरांगे पाटील यांनी आपण विजयाच्या उंबरठ्यावर असून आता कोणत्याही परिस्थितीत माघार घेणार नसल्याचे स्पष्ट केले. राज्यात सापडलेल्या ५८ लाख कुणबी नोंदींच्या आधारे संबंधितांना कुणबी प्रमाणपत्रे द्यावीत आणि प्रमाणपत्र घेतलेल्यांना जातवैधता प्रमाणपत्र द्यावे, अशी प्रमुख मागणी त्यांनी केली. सरकारकडून मागण्या मान्य केल्या जातात; मात्र त्यांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचा आरोप जरांगे यांनी केला. त्यामुळे हे शेवटचे आंदोलन असून आरक्षणाची संपूर्ण अंमलबजावणी होईपर्यंत उपोषण सोडणार नसल्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चर्चेसाठी यावे, असे आवाहन करताना जरांगे यांनी, आज गोडीने बोलतोय, उद्या बिघडू शकतो, असा इशारा दिला. आता सरकारला अधिक वेळ देणे शक्य नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.मराठ्यांनो गाफील राहू नका, घरात बसून राहू नका. मी अन्न-पाण्याविना उपोषणाला बसलो आहे. अंतिम लढ्यासाठी अंतरवाली सराटीत या, असे आवाहन त्यांनी समाजबांधवांना केले. सरकारवर विश्वास ठेवणे बंद करा, असे सांगतानाच मराठा समाजाला मोठे होऊ न देण्याचे धोरण सरकारचे असल्याचा आरोपही त्यांनी केला.संघर्ष केल्यास पुढील पिढीला त्याचा फायदा होईल, असे सांगत आंदोलनात बलिदान दिलेल्या मराठा कुटुंबांना नोकरी पान ४ वर

## नांदेडचे भूमीपुत्र पोलीस उपनिरीक्षकाची आत्महत्या

### हिंगोली जिल्ह्यात रेल्वेसमोर उडी घेतली



हिंगोली/प्रतिनिधी- कर्तव्य बजावत असलेल्या पोलीस उपनिरीक्षक व नांदेड जिल्ह्यातील मुखेडचे भूमीपुत्र अमोल विठ्ठलराव गंगलवाड यांनी आज अचानक रेल्वेसमोर उडी घेऊन जीवन संपविल्याने हिंगोली शहरात खळबळ उडाली. खटकाळी बायपास परिसरात शनिवारी सकाळी घडलेल्या या घटनेने मुखेड तालुक्यातील चांडोळा येथे हळहळ व्यक्त केली जात आहे.

चांडोळा ता.मुखेड येथील रहिवाशी असलेले पोलीस उपनिरीक्षक अमोल गंगलवाड हे परभणी जिल्हा पोलीस दलात कार्यरत होते. नुकतीच त्यांची बदली हिंगोली येथे झाली होती. आज खटकाळी रेल्वे उड्डाणपुलाजवळ सकाळी साडेआठ ते नऊच्या सुमारास पूर्णेकडून अकोल्याकडे जाणाऱ्या पॅसेंजर रेल्वेसमोर त्यांनी उडी घेतल्याची प्राथमिक माहिती आहे. विशेष म्हणजे, त्यांनी खाकी गणवेशातच हे टोकाचे पाऊल उचलले. घटनेची माहिती मिळताच शहर पोलीस ठाण्याचे निरीक्षक देवेंद्रसिंह ठाकूर, सहायक निरीक्षक दीपक मस्के, उपनिरीक्षक संजय मार्के यांच्यासह पान ४ वर

## गंगाबेट रेती घाटावर पोलीसांची कारवाई

नांदेड/प्रतिनिधी-मौजे गंगाबेट शिवारातील गोदावरी नदीच्या पात्रातून रेती उपसा करणाऱ्या ठिकाणी नांदेड ग्रामीण पोलीसांनी शुक्रवारी सायंकाळी छापा टाकुन अकरा लाख रुपयांचा ऐवज जप्त केला आहे.



गंगाबेट शिवा-रातील नदी पात्रातून अवैधरित्या रेती उपसा सुरु असल्याची माहिती नांदेड ग्रामीण पोलीसांना मिळाली. पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या नेतृत्वाखाली पोलीसाच्या पथकाने शुक्रवारी रेती घाटावर छापा टाकला. नदीच्या पात्रातून इंजिनच्या साह्याने रेती उपसा सुरु होता. पोलीसांनी दोन इंजीन, आठ तराफे, २६ ब्रास रेतीचा साठा असा अकरा लाख रुपयांचा ऐवज जप्त केला. पंचासमक्ष पोलीसांनी जप्त केलेले तराफे व इंजिन जाळून नष्ट केले आहे. याप्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात सोमनाथ सोनटक्के, सखाराम तोंडचिरे यांच्या विरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. नांदेड ग्रामीण पोलीसांकडून अवैध रेती विरुद्ध सतत कारवाई सुरु असतांनाही रेती तस्करांकडून रेतीचा उपसा सर्रासपणे सुरु आहे.

## ज्योतिबा खराटेंच्या वाढदिवशी विद्रोही विचारांचा जागर

### नितीन चंदनशिवेंच्या प्रबोधनाची मेजवानी





किनवट/प्रतिनिधी- शिवसेनेचे नांदेड जिल्हाप्रमुख ज्योतिबा खराटे यांचा ७ सप्टेंबर रोजी वाढदिवस किनवट शहरासह तालुक्यात विविध उपक्रमांनी साजरा करण्यात येणार असून या निमित्त साईवंदना मंगल कार्यालयात महाराष्ट्राचे ख्यातनाम विद्रोहीकवी, दंगलकार, सुप्रसिद्ध व्याख्याते नितीन चंदनशिवे यांच्या जाहीर व्याख्यानाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शिवसेनेचे उपनेते तथा जिल्हा संपर्कप्रमुख बबनराव थोरात हे भूषवणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरद पवारगट) नेत्या बेबीताई प्रदीप नाईक यांच्या हस्ते उदघाटन होणार आहे. या कार्यक्रमास शिवसेनेचे नांदेड जिल्हाप्रमुख बबनराव बारसे, भुजंग पाटील, यवतमाळ जिल्हाप्रमुख प्रवीण शिंदे, किनवट नगर परिषदेच्या नगराध्यक्षा सौ.सुजाता विनोद एंड्लवार, माहूर नगरपंचायतीचे नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांची उपस्थिती असणार आहे. या वाढदिवसानिमित्त किनवट शहरासह ग्रामीण भागात वेगवेगळे उपक्रम राबविले जाणार आहेत. ७ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता साईवंदना मंगल कार्यालयात महाराष्ट्राचे ख्यातनाम विद्रोही कवी दंगलकार पान ४ वर

## आदिवासींचे रिक्त पदे तीन महिन्यांत भरु-मुख्यमंत्री फडणवीस

### आंदोलक विद्यार्थी उपोषणावर ठाम

मुंबई/प्रतिनिधी- आदिवासी विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिष्टमंडळाशी आज चर्चा केली असून, १२ हजार ५०० अधिसंख्य व रिक्त पदांवर पात्र अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची भरती करण्याची कार्यवाही सुरू करण्याचे आश्वासन देण्यात आले. परंतु या आश्वासनाने आंदोलनकर्ते आदिवासी विद्यार्थ्यांचे समाधान झाले नसून तुर्त हे आंदोलन सुरुच ठेवण्याचा निर्धार विद्यार्थ्यांनी केला आहे.

पुण्यातील मांजरी येथे आदिवासी विद्यार्थ्यांचे सुरू असलेले उपोषण आज १७ व्या दिवशीही कायम असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाची बैठक झाली. पुढील तीन महिन्यांत भरतीची जाहिरात काढण्याचे तसेच अनुसूचित जमातीचा बिंदू क्रमांक पूर्वीप्रमाणे दोनवर आणण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिल्याची माहिती विद्यार्थ्यांनी दिली. वैधता प्रमाणपत्राच्या प्रश्नावरही तातडीने कार्यवाही करण्याचे आश्वासन देण्यात आले.विद्यार्थ्यांनी डीबीटी पद्धत रद्द करून वसतिगृहातील पूर्वीची प्रत्यक्ष भोजन व्यवस्था सुरू करावी, तसेच आश्रमशाळा व वसतिगृहांतील सेंट्रल किचन पान ४ वर

## अल्पवयीन मुलीवर बलात्कार करणाऱ्या गुंड शेख रफीक याच्यावर एमपीडीए अंतर्गत कारवाई करावी

### एमआयएमची मागणी



नांदेड/प्रतिनिधी-जुन्या नांदेड शहरातील एकबालनगर येथे राहणाऱ्या एका अल्पवयीन मुलीवर सराईत गुन्हेगार शेख रफीक शेख रौफ याने जीवे मारण्याची धमकी देवून बलात्कार केला आहे. या सराईत गुन्हेगारावर एमपीडीए अंतर्गत कारवाई करावी अशी मागणी एमआयएमच्या एका शिष्टमंडळाने इतवारा उपविभागाचे पोलीस उपअधीक्षक प्रशांत शिंदे यांची भेट घेवून निवेदनाद्वारे केली आहे.

एमआयएमने निवेदनात म्हटले आहे की, शेख रफीक शेख रौफ रा.परभणी याच्या विरुध्द गंभीर स्वरुपाचे नांदेड, परभणी या ठिकाणी अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. शेख रफीक याने एकबालनगर भागात राहणाऱ्या पंधरा वर्षाच्या मुलीस जीवे मारण्याची धमकी देवून तीच्यावर जबरदस्तीने बलात्कार केला आहे. याप्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात पोक्सो व अन्य कलमा अंतर्गत शेख रफीक याच्या विरुध्द गुन्हा दाखल केला असून पोलीसांनी त्यास अटक केली. न्यायालयाच्या आदेशावरुन शेख रफीक सध्या पोलीस कोठडीत आहे. शेख रफीक हा गुंड प्रवृत्तीचा असून त्याच्यामुळे शाळेत येणाऱ्या-जाणाऱ्या मुलींचा सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. बलात्कार पिडीत मुलीच्या कुटुंबियालाही जीवितेचा धोका निर्माण झाला आहे. प्रशासनाने शेख रफीक याच्यावर एमपीडीए पान ४ वर

## परिक्रमा यात्रा नियोजनाचा फज्जा,नारळी पौर्णिमा यात्रेत भाविकांचे अतोनात हाल



**सरफराज दोसानी**

माहूर:श्रीक्षेत्र माहूर गडावरील प्रमुख यात्रांपैकी एक असलेल्या नारळी पौर्णिमा परिक्रमा यात्रेचे नियोजन यंदा अक्षरशः कागदावरच राहिल्याचे चित्र दिसून आले. लाखो भाविकांच्या गर्दीचा अंदाज असतानाही यात्रा सुरू होण्याच्या अवघ्या तीन दिवसांपूर्वी झालेल्या औपचारिक नियोजन बैठकीनंतर प्रशासनाने नेमके काय नियोजन केले, असा संतप्त सवाल आता भाविकांकडून उपस्थित होत आहे. प्रशासनाच्या नियोजन शून्य कारभारामुळे भाविकांचे अतोनात हाल झाले आहेत.

राज्याच्या कानाकोपऱ्यातून तसेच परराज्यांतून आलेल्या लाखो भाविकांनी माहूर गडावरील विविध देवस्थाने, मठ-आश्रम आणि तीर्थस्थळांचे दर्शन घेत परिक्रमा पूर्ण केली. प्राथमिक अंदाजानुसार ७ ते ८ लाख भाविकांचे आगमन झाले असावे, मात्र एवढ्या मोठ्या जनसमुदायाच्या तुलनेत आवश्यक असलेल्या सुविधा आणि सुरक्षा व्यवस्थेचा पुरता अभाव जाणवला.

परिक्रमा मार्गावर कुठे अंधार, कुठे पाण्याचा प्रश्न, कुठे चिखल आणि खड्डे, तर कुठे वन्यप्राण्यांचा धोका. मातृतीर्थ तलावाजवळ सुरक्षेचा अभाव, पार्किंगची गैरसोय आणि वीजपुरवठ्याचा लपंडाव यामुळे भाविकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागला. विशेष म्हणजे, या गैरसोयींबाबत प्रश्न उपस्थित होत असताना प्रशासनातील काही अधिकाऱ्यांकडून भक्तीच्या मार्गात अडथळे येतच असतात, त्रास झाल्याशिवाय देव भेटत नाही अशा स्वरूपाची वक्तव्ये केली जात असल्याचे भाविक सांगतात. प्रशासनाच्या अपयशाचे समर्थन करण्यासाठी श्रद्धेचा आधार घेणे योग्य आहे का? असा सवाल आता उपस्थित होत आहे.

श्री रेणुका मंदिर संस्थानच्या अखत्यारीतील माहूर-रेणुका देवी महामार्गावरील पथदिवे यात्रा काळात बंद असल्याने भाविकांमध्ये तीव्र नाराजी दिसून आली. माहूर टी-पॉइंटपासून श्री रेणुका देवी मंदिर, पुढे दत्तशिखरपर्यंतचा प्रशस्त रस्ता असूनही ऐन यात्रेच्या काळात या मार्गावर अंधाराचे साम्राज्य होते. रात्रीच्या वेळी अनेक भाविकांनी मोबाईलच्या टॉर्चच्या प्रकाशात, तर काहींनी अक्षरशः काळोखातून वाट काढत परिक्रमा पूर्ण केली. हा केवळ गैरसोयीचा विषय नसून एवढ्या मोठ्या गर्दीत अपघात किंवा अनुचित प्रकार घडण्याची शक्यता निर्माण करणारा गंभीर सुरक्षा प्रश्न आहे. रक्षाबंधनच्या पूर्वसंध्येपासून यात्रेच्या समाप्तीपर्यंत रात्रभर भाविकांची वर्दळ असताना पथदिवे बंद राहणे म्हणजे नेमके कोणाचे नियोजन, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

**अन्नछत्र ते मातृतीर्थ: रस्ता की खड्ड्यांचे साम्राज्य?**

परिक्रमा मार्गावरील अन्नछत्र ते मातृतीर्थ या रस्त्याची अवस्था पाहता प्रशासनाने यात्रेपूर्वी प्रत्यक्ष पाहणी केली होती का, असा प्रश्न पडतो.रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे, चिखल आणि साचलेले पाणी. दोन्ही बाजूंना घाणीचे डबके आणि त्यातून येणारा दुर्गंध. अशा परिस्थितीत ज्येष्ठ नागरिक, महिला, लहान मुले आणि बाहेरून आलेल्या भाविकांना वाट काढत परिक्रमा पूर्ण करावी लागली.लाखो भाविक येणार हे प्रशासनाला माहीत असताना रस्त्याची साधी डागडुजीही का करण्यात आली नाही? हा प्रश्न आता केवळ भाविकांचा नसून संबंधित यंत्रणांच्या कार्यक्षमतेचा बनला आहे.

**जंगलातील परिक्रमा अन् वन्यप्राण्यांचा धोका**

माहूरची परिक्रमा मोठ्या प्रमाणात जंगल आणि डोंगराळ भागातून जाते. त्यामुळे वन्यप्राण्यांपासून भाविकांची सुरक्षा हा सर्वात महत्त्वाचा पान २ वर

# महामार्गांची सुरक्षा आवश्यक!

**देशभरात पायाभूत सुविधांच्या विकासाची चर्चा करताना समृद्धी महामार्गाचा आवर्जून उल्लेख केला जातो. महाराष्ट्राच्या आर्थिक आणि वाहतूक व्यवस्थेला नवी गती देणारा, मुंबई आणि नागपूरदरम्यानचा प्रवास अधिक वेगवान करणारा हा महत्त्वाकांक्षी महामार्ग आहे. जलद, आधुनिक आणि सुरक्षित प्रवासाची सुविधा देणारा महामार्ग म्हणून त्याचे कौतुकही झाले. विकासाच्या दृष्टीने हे कौतुक निश्चितच योग्य आहे. मात्र, वेगाबरोबर सुरक्षितता नसेल तर महामार्गाची भव्यता अपुरी ठरते. अलीकडे समृद्धी महामार्गावर घडलेल्या दोन लुटीच्या घटनांनी याच सुरक्षिततेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूरजवळ हडस पिंपळगाव टोलनाक्याच्या परिसरात एका फॉर्च्युनर वाहनाला तीन वाहनांनी घेरून उद्योजकाला मारहाण करण्यात आली आणि त्याच्याकडील अडीच लाख रुपये लुटण्यात आले. ही घटना केवळ लुटीपुरती मर्यादित नाही. संबंधित वाहनाच्या डॅश कॅमेऱ्यात संपूर्ण प्रकार चित्रित झाल्याने महामार्गावरील गुन्हेगार किती निर्भय झाले आहेत, याची कल्पना येते. मुंबई कॉरिडॉरच्या एक्झिट क्रमांक १८ जवळ बुधवारी दुपारी चारच्या सुमारास घडलेली ही घटना दिवसाढवळ्या घडली, हे तर अधिकच चिंताजनक आहे.त्याहून गंभीर बाब म्हणजे या घटनेनंतर तक्रार दाखल करण्यासाठी संबंधित तरुणांना सुमारे १४ तास एका पोलीस ठाण्यातून दुसऱ्या पोलीस ठाण्यात फिरावे लागले. गुन्हेगारांनी महामार्गावर वाहन अडवून लुटावे आणि पीडितांनी न्यायासाठी पोलीस ठाण्यांचे उंबरठे झिजवावेत, ही व्यवस्था कशी स्वीकारायची? केंद्र सरकारने नव्या फौजदारी कायद्यांतर्गत 'झिरो एफआयआर'ची तरतूद केली आहे. कोणत्याही पोलीस ठाण्यात गुन्ह्याची तक्रार नोंदवून ती संबंधित पोलीस ठाण्याकडे वर्ग करता येते. मग प्रत्यक्षात या तरतुदीचा वापर करण्यात अडचणी का येतात, हा प्रश्न आहे. कायदे बदलणे पुरेसे नाही; त्यांची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेला त्यामागची भावना समजणे अधिक महत्त्वाचे आहे. या घटनेच्या दुसऱ्याच दिवशी समृद्धी महामार्गाच्या सिन्नर तालुक्यातील माळढोण शिवाराजवळ नांदेडच्या एका तरुण उद्योजकाला लुटण्याचा प्रयत्न झाल्याची घटना समोर आली. लुटारूंनी धावत्या वाहनाचे टायर टोचून ते पंचर केले आणि त्यानंतर लाखो रुपयांची लूट करण्याचा प्रयत्न केला. सुदैवाने संबंधित उद्योजकाकडे परवानाधारक रिव्हॉल्व्हर होते. त्याने प्रसंगावधान राखून चोरट्यांच्या दिशेने गोळीबार केल्याने तो या संकटातून बचावला. एखाद्या महामार्गावर सुरक्षित प्रवास करण्यासाठी नागरिकांनी स्वतःच्या संरक्षणासाठी शस्त्र बाळगावे लागणे, ही सुरक्षित महामार्गाची ओळख नक्कीच नाही. समृद्धी महामार्गावर अपघातांचे प्रमाण आणि त्यामागची कारणे याबाबत यापूर्वीही चिंता व्यक्त झाली आहे. वेग, वाहनचालकांचा निष्काळजीपणा, झोप येणे, अचानक निर्माण होणाऱ्या अडचणी अशा अनेक कारणांमुळे अपघात घडतात. आता त्यात महामार्गावरील लूटमार आणि दरोड्यांची भर पडत असेल तर परिस्थितीकडे गांभीर्याने पाहण्याची वेळ आली आहे. महामार्ग म्हणजे केवळ डांबरी रस्ता, टोलनाके आणि आकर्षक पथदिवे नव्हेत. महामार्गाच्या प्रत्येक टप्प्यावर नागरिकांना पोलिसांची उपस्थिती जाणवली पाहिजे. सीसीटीव्ही कॅमेरे, नियमित गस्त, आपत्कालीन संपर्क व्यवस्था, संशयास्पद वाहनांवर लक्ष, टोलनाक्यांवरील प्रभावी तपासणी आणि तातडीने मदत मिळण्याची यंत्रणा सक्षम केली पाहिजे. एखाद्या वाहनाचा टायर पंचर करून लूट करण्यासारख्या घटना घडत असतील तर त्या परिसरातील सुरक्षाव्यवस्थेतील त्रुटी शोधणे आवश्यक आहे.विकासाच्या प्रकल्पांचे कौतुक करणे गरजेचे आहे;पण कौतुकाच्या नादात त्रुटींकडे डोळेझाक करणे योग्य नाही. समृद्धी महामार्ग हा महाराष्ट्राच्या विकासाचे प्रतीक आहे. त्यामुळे त्याची सुरक्षितता ही केवळ पोलिसांची नव्हे, तर प्रशासन, महामार्ग प्राधिकरण आणि सरकारची सामूहिक जबाबदारी आहे. प्रवासाचा वेग वाढविण्याबरोबरच प्रवाशांच्या मनातील भीती कमी करणे हेही विकासाचेच एक मोजमाप आहे. महामार्गावर अपघात झाला तर मदत मिळते का?, वाहन बंद पडले तर सुरक्षा मिळते का?, लुटीचा प्रयत्न झाला तर पोलीस तातडीने धावून येतात का?, आणि तक्रार करण्यासाठी पीडिताला भटकावे लागत नाही ना?, या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे मिळाली पाहिजेत. अन्यथा कितीही मोठा, आधुनिक आणि वेगवान महामार्ग उभारला तरी त्याला 'सुरक्षित महामार्ग' म्हणता येणार नाही. विकासाच्या रस्त्यावर नागरिकांच्या सुरक्षेचा मैलाचा दगड सर्वांत आधी उभा राहिला पाहिजे.**

# मराठी भाषेवर निस्सीम प्रेम करणाऱ्या यास्मिन शेख

प्रा.स्वाती हरिभाऊ काटे
समाजशास्त्र विभाग प्रमुख
पीपल्स कॉलेज,नांदेड.

अभिजात मराठी भाषेला समृद्ध करणाऱ्या महत्त्वाच्या संशोधक, लेखिका म्हणून डॉ.यास्मिन शेख यांचा गौरव केला जातो.

मराठी भाषेवर, मराठी व्याकरणावर, आपल्या शिकवण्याच्या छंदावर जीवापाड प्रेम करणाऱ्या यास्मिन शेख यांना १०१ वर्षांचे आयुष्य लाभले. २४ ऑगस्ट रोजी त्यांचे निधन झाले. यास्मिन शेख यांचे मूळ नाव जेऊशा रूबेन. त्या बेनेइस्राईल ज्यू होत्या. त्यांचे वडिल जॉन रूबेन सार्वजनिक बांधकाम विभागात नोकरीला होते. महाराष्ट्रातच यास्मिन लहानाच्या मोठ्या झाल्या. मराठी भाषेवर त्यांचे नितांत प्रेम. मराठी भाषा आणि साहित्य हा विषय घेऊन त्यांनी आपले पदवीचे शिक्षण पूर्ण केले. १९४९ मध्ये त्यांनी अजिज अहमद इब्राहिम शेख यांच्याशी आंतरधर्मीय विवाह केला.

मराठी शब्दलेखन कोश, भाषाशास्त्र, व्याकरण, शुद्धलेखन, मुद्रितशोधन, मराठी लेखन मार्गदर्शिका, मराठी व्याकरणकोश ही त्यांनी लिहिलेली महत्त्वाची पुस्तके. ही पुस्तके म्हणजे मराठी भाषेला मिळालेला समृद्ध खजिना आहे. प्रा.यास्मिन शेख यांना त्यांच्या भाषाविषयक कार्यासाठी २०१५ सालचा डॉ. गं.ना. जोगळेकर स्मृती पुरस्कार मिळाला. सन २०१७ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागातर्फे डॉ.अशोक केळकर भाषा अभ्यासक पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. मसापच्या जीवनगौरव पुरस्काराने २६ मे २०१७ रोजी त्यांना सन्मानित करण्यात आले, तर अलिकडेच कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्टतर्फे शिक्षणप्रेमी शांताराम शहासने जीवनगौरव पुरस्कार देऊन २२ फेब्रुवारी २०२४ रोजी त्यांच्या मराठी भाषा सेवेच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

'मराठी शब्दलेखन कोश' या ग्रंथामुळे वाचक म्हणून यास्मिन शेख यांच्या कार्याशी मी परिचित झाले. भाषा आणि मुळाक्षरे ही शिकवावी लागतात हे जसं सत्य आहे तसेच भाषेचे आणि मुळाक्षरे याचे ज्ञान मुलास उपजत असते त्याला




नंतर शिक्षक विशिष्ट आकार देण्याचे कार्य करतात, या संदर्भाने त्यांनी जी निरिक्षणे लहान मुलांच्या रेघोट्यांचा अभ्यास केल्यावर नोंदवली ती अत्यंत महत्त्वाची आहेत. बाल मानसशास्त्र, भाषा व मुळाक्षरे शिकवणाऱ्याला सखोल असे मार्गदर्शन करणारी ही निरिक्षणे आहेत. यास्मिन शेख यांनी मांडलेल्या निष्कर्षानुसार मीही लहान मुलांच्या रेघोट्यांचा अभ्यास केला. हा अभ्यास कला आत्मसात करण्यास जेवढा महत्वाचा आहे तेवढाच प्रत्येक भाषा अभ्यासकाला मार्गदर्शक ठरणारा आहे.

लहान मूल हे नुसत्या रेघोट्या मारत नसते तर ते त्या माध्यमातून व्यक्त होत असते.प्रत्येक मुलाच्या रेघोट्या विशिष्ट लयीत असतात. त्यातून मुळाक्षरांचे आकार सहज सापडतात, असेही यास्मिन शेख यांनी निरीक्षणात नोंदवले. या संदर्भामध्ये अभ्यास करत असताना, मला त्यांच्या निरीक्षणातील बारकावे लक्षात येत गेले. भाषेचा सखोलपणे अभ्यास करणाऱ्या यास्मिन शेख यांनी आपले भाषाप्रेम, व्याकरणप्रेम हे केवळ जपले नाही तर ते अभ्यासकांना मार्गदर्शक कसे ठरेल यासाठी प्रयत्न केले. त्यातून त्यांची ग्रंथनिर्मिती झाली. त्यांनी लिहिलेल्या ग्रंथातून हे लक्षात येते. शाळेतील कविता (बोली:समाज संस्कृती भाषांतर अनुबंध) हा ग्रंथ मी व डॉ. पृथ्वीराज तौर यांनी संपादित केला. सदरील ग्रंथ आम्ही अन्य भाषाभ्यासक, संशोधक यांच्यासमवेत डॉ. यास्मिन शेख यांना अर्पण केला आहे. वयाच्या १०१ व्या वर्षी हे पुस्तक त्यांनी आपल्या मुलीकडून वाचून घेतले आणि लिखित प्रतिक्रिया कळवली. अगदी एक महिना अगोदर २६ जुलै २०२६ रोजी यास्मिन शेख यांचे पत्र आले होते. यास्मिन शेख यांची ही प्रतिक्रिया दीड पानांची आहे. त्यांचे हे पत्र म्हणजे आमच्या कार्याला, तसेच 'शाळेतील कविता' या उपक्रमात सहभागी मुलांना मिळालेला आशीर्वाद आहे. यास्मिन शेख यांचे मराठी मातृभाषेवर नितांत प्रेम होते. 'मी मराठी आहे' हे त्या आवर्जून सांगत. प्रत्येकाने आपल्या मातृभाषेवर प्रेम केले पाहिजे हा त्यांचा संदेश लक्षात ठेवायला हवा. पुढच्या पिढीने आपली भाषा जिवंत ठेवावी यासाठी, दिलेली ही आर्त हाक आहे.

भाषेसारखा समृद्ध खजिना मानवाने हजारो वर्षांच्या प्रयत्नांतून निर्माण केला. मात्र तो नष्ट करण्यासाठी एक पिढी पुरेशी आहे. परंतु पुन्हा नव्याने, तीच भाषा निर्माण करण्यासाठी शेकडो वर्षे लागतील.डॉ. यास्मिन शेख यांचे कार्य आत्मीय आनंद देणारे आहे. त्यांच्या चेहऱ्यावरील प्रसन्नता लहान बालकाच्या चेहऱ्यावरच्या तेजसारखी आहे. हेच तेज त्यांच्या चेहऱ्यावर वयाच्या १०१ व्या वर्षी देखील झळाळत होते. हा आनंद कार्याची खरी पावती आहे. डॉ. यास्मिन शेख यांच्या कार्याला त्रिवार अभिवादन.

(प्रा.स्वाती हरिभाऊ काटे नांदेड येथील पीपल्स कॉलेज मध्ये समाजशास्त्र विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत.)

# मॅडिसन स्क्वेअर गार्डनमध्ये आरएसएसचा कार्यक्रम; ममदानींच्या विरोधामुळे विचारसरणीवर पुन्हा प्रश्नचिन्ह

ॲड.संजय रुईकर




राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (आरएसएस) सरसंघचालक मोहन भागवत यांच्या उपस्थितीत २९ ऑगस्ट रोजी न्यूयॉर्कच्या प्रसिद्ध मॅडिसन स्क्वेअर गार्डनमध्ये होणाऱ्या प्रस्तावित कार्यक्रमावरून अमेरिकेत नवा राजकीय आणि वैचारिक वाद निर्माण झाला आहे. न्यूयॉर्क शहराचे महापौर झोहरान ममदानी यांनी या कार्यक्रमाला आपला स्पष्ट विरोध दर्शवित, मी या कार्यक्रमाचे समर्थन करत नाही, अशी भूमिका घेतली आहे. मात्र हा खासगी कार्यक्रम असल्याने तो रद्द करण्याचा कायदेशीर अधिकार शहर प्रशासनाकडे आहे की नाही, याबाबत त्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे.

ममदानी यांनी आरएसएसच्या विचारसरणीवरही गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांच्या मते, कोणत्याही व्यक्तीला त्याचा धर्म, रंग, विचारधारा किंवा मूळ देश काहीही असो, समान स्थान मिळाले पाहिजे. त्यामुळे समाजात विभाजनाची भावना निर्माण करणाऱ्या किंवा एखाद्या विशिष्ट समूहाच्या वर्चस्वाला प्राधान्य देणाऱ्या विचारसरणीला विरोध करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आरएसएसकडून मात्र या टीकेला उत्तर देताना भागवत यांचा न्यूयॉर्कमधील कार्यक्रम हा इंटरफेथ अर्थात विविध धर्मांमधील संवादावर आधारित असल्याचे सांगण्यात आले आहे. संघाचे प्रचारप्रमुख सुनील आंबेकर यांनी हा कार्यक्रम खुल्या संवाद, परस्पर आदर आणि विविध समुदायांमध्ये संवाद वाढविण्याच्या उद्देशाने असल्याचे म्हटले आहे.मात्र, प्रश्न केवळ एका कार्यक्रमाचा नाही. आरएसएसच्या शताब्दी वर्षाच्या पार्श्वभूमीवर संघाची भारताबाहेरील वाढती वैचारिक आणि सामाजिक उपस्थिती हा व्यापक चर्चेचा विषय बनला आहे. अमेरिकेतील काही मानवाधिकार आणि धार्मिक स्वातंत्र्याशी संबंधित संघटनांनी आरएसएसच्या भूमिकेबाबत चिंता व्यक्त केली आहे. अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय धार्मिक स्वातंत्र्य आयोगाने (USCIRF) आरएसएसशी संबंधित व्यक्तींवर लक्षित निर्बंधांची मागणीही केली आहे; भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने मात्र USCIRF च्या भूमिकेला पक्षपाती आणि अविश्वसनीय ठरवले आहे.

आरएसएस स्वतःला सांस्कृतिक आणि सामाजिक संघटना मानतो आणि हिंदू समाजाचे संघटन, सांस्कृतिक एकात्मता आणि राष्ट्रीय एकतेचा पुरस्कार करीत असल्याचे सांगतो. दुसरीकडे, टीकाकारांचा आरोप आहे की संघाच्या विचारसरणीचा भारतातील अल्पसंख्याकांच्या सामाजिक आणि राजकीय स्थानावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे भागवत यांच्या न्यूयॉर्क दौऱ्याला केवळ एका सार्वजनिक कार्यक्रमाचे स्वरूप न राहता, भारतातील राष्ट्रवाद, धर्मनिरपेक्षता, बहुसांस्कृतिकता आणि अल्पसंख्याकांच्या अधिकारांवरील आंतरराष्ट्रीय चर्चेचे स्वरूप प्राप्त झाले आहे. मॅडिसन स्क्वेअर गार्डनमधील कार्यक्रम हा त्यामुळे केवळ आरएसएसचा विदेशातील कार्यक्रम राहिलेला नाही; तो भारताची ओळख नेमकी कोणती? आणि बहुविध समाजात राष्ट्रवादाची मर्यादा काय? या मूलभूत प्रश्नांना पुन्हा ऐरणीवर आणणारा प्रसंग ठरला आहे. न्यूयॉर्कसारख्या बहुसांस्कृतिक शहराच्या महापौराने आरएसएसच्या कार्यक्रमाला विरोध दर्शविल्याने संघाच्या जागतिक विस्ताराच्या प्रयत्नांसमोरही वैचारिक स्वीकारार्हतेचे आव्हान उभे राहिले आहे. आता भागवत यांच्या भाषणातून संघ जगासमोर कोणती भूमिका मांडतो आणि त्यावर अमेरिकेतील विविध समुदायांची प्रतिक्रिया काय उमटते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

पान १ वरुन

## परिक्रमा यात्रा नियोजनाचा फज्जा,...

विषय असायला हवा होता. वनविभागाचे कर्मचारी काही ठिकाणी तैनात होते; मात्र भाविकांच्या प्रचंड संख्येच्या तुलनेत ही व्यवस्था अपुरी पडल्याचे चित्र दिसून आले. याच काळात एका भाविकावर रानडुकराने हल्ला करून तो गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. त्यामुळे वन्यप्राण्यांपासून भाविकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

### मातृतीर्थ तलाव : सुरक्षेचा अभाव जीवावर बेतला?

मातृतीर्थ तलाव हा परिक्रमा मार्गावरील महत्त्वाचा टप्पा. येथे मोठ्या संख्येने भाविकांची गर्दी होत असताना सुरक्षा रक्षक, जीव रक्षक पथक आणि प्रभावी देखरेख व्यवस्था पुरेशी होती का? हा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. यात्रेदरम्यान एका भाविकाचा तलावात बुडून मृत्यू झाल्याची घटना घडल्याने प्रशासनाच्या जलसुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. लाखो भाविक येणार हे माहीत असताना तलाव परिसरात प्रशिक्षित जीवरक्षक, पुरेशी बॅरिकेडिंग, प्रकाशव्यवस्था, सतत देखरेख आणि आपत्कालीन बचाव पथक तैनात करणे ही प्राथमिक जबाबदारी नव्हती का? जीव गेल्यानंतर पंचनामा करण्यापेक्षा जीव वाचविण्यासाठी आधीच नियोजन का झाले नाही?

### वीज वितरण कंपनीचा तांत्रिक बिघाड मंत्र

यात्रा काळात वीज पुरवठ्याच्या लपंडावानेही भाविक आणि स्थानिक नागरिक त्रस्त झाले. वीज गेल्यानंतर नेहमीचे उत्तर तांत्रिक बिघाड! तांत्रिक बिघाड कोणाच्या हातात नसला तरी त्याचा सामना करण्यासाठी आपत्कालीन पथक, अतिरिक्त कर्मचारी आणि पर्यायी व्यवस्था करणे मात्र संबंधित यंत्रणेच्या हातात असते. लाखो भाविकांची गर्दी होणार असताना वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी स्वतंत्र नियंत्रण कक्ष किंवा विशेष पथकाची प्रभावी व्यवस्था होती का, याचे उत्तर प्रशासनाने द्यावे. नियोजन बैठकीत सूचना देणे आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे यात जमीन-अस्मानाचा फरक असतो.नळी फुंकली सोनारे, इकडून तिकडे गेले वारे अशी अवस्था नियोजनाची झाली असेल, तर बैठका घेऊन उपयोग काय?

### वाहन पार्किंगचा प्रश्नही कायम

माहूरमध्ये लाखो भाविक येणार असताना वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढणार हे उघड होते. तरीही पार्किंग व्यवस्थेचे नियोजन कितपत प्रभावी होते, याबाबत भाविकांमध्ये नाराजी दिसून आली.वाहनांच्या गर्दीचा परिणाम वाहतूक व्यवस्थेवर, स्थानिक नागरिकांवर आणि आपत्कालीन वाहनांच्या हालचालीवर होण्याची शक्यता असताना यासाठी स्वतंत्र आणि स्पष्ट नियोजन आवश्यक होते.श्रीक्षेत्र माहूर शहरात देवदर्शन साठी येणाऱ्या सर्व धर्मीय भाविकांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढलेली आहे. गडावरील सर्व धर्मीय देवस्थानावर येणारे अधिकांश भावीक खाजगी वाहनाद्वारे येत असल्याने वाहनतळ नसल्याने माहूर शहरात असलेल्या गायरान जागे पैकी दहा एकर जागा विनामूल्य पार्किंग साठी नगरपंचायत कडे हस्तांतरित करावी अशी मागणी माहूरचे नगराध्यक्ष फिरोज भाई दोसानी यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा कडे गत वर्षी निवेदन देऊन केली होती मात्र अजून या बाबत निर्णय झाला नसल्याने पुढील नवरात्र उत्सवात सुद्धा पार्किंग चा प्रश्न उद्भवणार आहे.

### बैठका झाल्या;मग नियोजन गेले कुठे?

यात्रेच्या अवघ्या काही तासांपूर्वी किंवा दिवसांमध्ये बैठका घेऊन नियोजन पूर्ण असल्याचे दाखविण्यापेक्षा प्रत्यक्ष परिक्रमा मार्गावर जाऊन परिस्थितीची पाहणी करणे गरजेचे होते.किती भाविक येणार? कुठे गर्दी होणार? कुठे प्रकाशाची गरज आहे? कुठे पाण्याची व्यवस्था हवी? कुठे वन्यप्राण्यांचा धोका आहे? कुठे जीवरक्षक आवश्यक आहेत? कुठे रस्त्यांची डागडुजी करावी लागणार आहे? कुठे वैद्यकीय पथके आणि रुग्णवाहिका ठेवायच्या आहेत? या प्रश्नांची उत्तरे नियोजन बैठकीत कागदावर असतीलही; पण भाविकांच्या पायाला लागलेला चिखल, अंधारात हातात धरलेला मोबाईलचा टॉर्च आणि जीव गमावलेल्या भाविकाचे कुटुंबीय यांना कागदी नियोजनाचा काय उपयोग?

माहूरची यात्रा ही केवळ स्थानिक यात्रा नाही. महाराष्ट्रासह विविध राज्यांतून लाखो भाविक श्रद्धेने येथे येतात. त्यांच्या श्रद्धेचा आदर करणे म्हणजे केवळ देवदर्शनाची व्यवस्था करणे नव्हे; तर त्यांचा जीव, सुरक्षितता, आरोग्य, पाणी, प्रकाश, रस्ते आणि मूलभूत सुविधा यांची हमी देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे.भाविकांना त्रास होणे म्हणजे भक्तीची परीक्षा नव्हे. अंधारात चालणे म्हणजे श्रद्धेची कसोटी नव्हे. खड्ड्यातून वाट काढणे म्हणजे भक्तीचा भाग नव्हे. वन्यप्राण्यांच्या हल्ल्याचा धोका पत्करणे म्हणजे देवाची परीक्षा नव्हे. नारळी पौर्णिमा यात्रा संपली असली तरी या यात्रेतील त्रुटींचा सखोल आढावा घेऊन जबाबदारी निश्चित करण्याची वेळ आता आली आहे.

# वीर शिरोमणी महाराणा प्रताप सेवाभावी संस्थेकडून विद्यार्थ्यांना गणवेश वाटप

धर्माबाद/प्रतिनिधी-समाजातील गरीब आणि गरजू घटकांना मदतीचा हात देण्यासाठी वीर शिरोमणी महाराणा प्रताप सेवाभावी संस्था नेहमीच अग्रेसर राहिली आहे. संस्थेच्या वतीने नुकतेच विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात आले असून, यामध्ये केशव शाळेतील १४ गरजू विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटप करण्यात आले.

यावेळी केशव शाळेचे मुख्याध्यापक चिचोंलीकर, सौ. ज्योती दगडगावे अन्य शिक्षक शिक्षिका उपस्थित होते. याशिवाय शिक्षण, आरोग्य आणि अन्नधान्य वाटप अशा विविध क्षेत्रांत संस्थेने आपला सामाजिक बांधिलकीचा ठसा उमटवला आहे. विविध समाज सुधारकांच्या जयंतीचे औचित्य साधून संस्थेच्या वतीने नागरिकांसाठी खिचडी, पाणी, मठ्ठा आणि खिर यांचे मोफत वाटप करण्यात आले. संस्थेच्या या स्तुत्य उपक्रमांमुळे सर्वसामान्य नागरिक आणि विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष नागनाथ शेठ गुजुलवाड, उपाध्यक्ष रमाकांत शेठ चक्करवार, सचिव धोंडीबा दळवा शिंदे, सहसचिव डॉक्टर लिंगारेड्डी अंकिटवार येताळकर यांचे विशेष नेतृत्व लाभले. तसेच सदस्य गंगाधर कोतापल्ली, परमेश्वर शेट्टी, पद्मलता पलकोंडवार, विजयकुमार राखोडे, गिरीश पांपटवार, परमेश्वर कवटिकवार, गंगाप्रसाद माळगे, भुमाराव सेठ इंदूर आणि नारायण गुडालोड यांचे मोलाचे योगदान लाभले. सर्व सदस्यांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे आणि एकजुटीमुळेच संस्थेला सामाजिक कार्य करण्याचे मोठे बळ मिळत आहे, अशी भावना संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी व्यक्त केली. संस्थेच्या या लोकोपयोगी कार्याबद्दल संपूर्ण परिसरातून कौतुक होत आहे.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# 'समान काम,समान वेतना'साठी न्यायालयीन कर्मचारी उपसणार संपाचे हत्यार

## राज्यातील ३४ हजार कर्मचाऱ्यांचा कामबंद आंदोलनाचा इशारा

नांदेड/प्रतिनिधी-उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यां-प्रमाणेच दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांना समान काम, समान वेतन मागणीसाठी राज्यातील ३४ हजार न्यायालयीन कर्मचारी १६ सप्टेंबरपासून संप पुकारणार आहेत. मुंबई येथे १६ ऑगस्ट रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत आंदोलनाची रूपरेषा निश्चित करण्यात आली असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाच्या वतीने देण्यात आली.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी गठित केलेल्या न्यायमुर्तीच्या विशेष समितीने ३१ जानेवारी २०२५ रोजी शासनास न्यायालयीन कर्मचा-यांच्या सुधारित वेतनश्रेणी बाबतचा गोपनीय अहवाल सादर केला असतांनाही मागील दोन वर्षापासून दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा सुधारित वेतनश्रेणीचा प्रस्ताव रखडल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी असून 'न्यायाघरीच अन्याय' होत असल्याने असंतोषाची भावना निर्माण झाली आहे. न्यायव्यवस्थेचा कणा म्हणून वर्षानुवर्षे प्रामाणिकपणे, जबाबदारीने आणि अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत न्यायालयीन कर्तव्य बजावणाऱ्या दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या वेतनातील असमानतेचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. उच्च न्यायालयाप्रमाणे दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांना सुध्दा 'समान कामासाठी, समान वेतन मिळणे हा न्याय्य आणि मूलभूत हक्क असून, हा हक्क डावलला जाऊ नये, असा ठाम निर्धार राज्यातील वर्ग-३, लघुलेखक, बेलिफ आणि चतुर्थश्रेणी न्यायालयीन कर्मचारी महासंघाने मागील दोन वर्षापासून लावून धरला आहे. परंतु शासनाच्या उदासीन धोरणामुळे न्यायालयीन कर्मचारी त्यांच्या वेतनवाढीच्या न्याय हक्कापासून वंचित आहेत. याकरिता न्यायालयीन महासंघ १६ सप्टेंबर रोजी एक दिवसीय काळ्या फिती लावून निषेध आंदोलन करणार आहे. त्यानंतरही मागणी मान्य न झाल्यास १६ आणि १७ ऑक्टोबर असे दोन दिवस पुन्हा काळ्या फिती लावून शासनाचा निषेध नोंदवण्यात येणार आहे. तरीही मागण्या पूर्ण न झाल्यास ५ नोव्हेंबर रोजी राज्यातील दुय्यम न्यायालयीन कर्मचारी एक दिवसीय सामूहिक रजेवर जाणार आहेत. जर त्यानंतर देखील मागण्या मंजूर न झाल्यास आंदोलनाचे शेवटचे हत्यार म्हणून राज्यातील सर्व ३४ हजार न्यायालयीन कर्मचारी हे १७ नोव्हेंबर पासून बेमुदत संप पुकारतील असा निर्वाणीचा इशारा महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाच्या वतीने देण्यात आला आहे.

# स्व.आ.प्रदीपजी नाईक यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ भाविकांना महाप्रसाद

## नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांचा सेवाभावी उपक्रम



माहूर/प्रतिनिधी- माहूर नगरीत येणारा प्रत्येक भाविक हा आपला पाहुणा आहे, या आपुलकीच्या भावनेतून नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी स्वर्गीय आ.प्रदीप नाईक यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ परिक्रमा यात्रेतील भाविकांसाठी भव्य महाप्रसादाचे आयोजन केले. या महाप्रसादातून सुमारे ५ क्विंटल मसाला भात भाविकांना वाटप करण्यात आले.

माहूर ही श्रद्धेची नगरी. दरवर्षी विविध धार्मिक यात्रा व उत्सवांच्या निमित्ताने लाखो भाविक माहूरमध्ये दाखल होतात. लांबचा प्रवास करून, दर्शन आणि परिक्रमा पूर्ण करून थकलेल्या भाविकांच्या चेहऱ्यावर दोन घास अन्नाचे समाधान दिसावे, या भावनेतून नगराध्यक्ष दोसानी हे मागील १० वर्षांपासून हा सेवाभावी उपक्रम राबवित असतात. अन्नदानाला भारतीय संस्कृतीत विशेष महत्त्व आहे. भुकेल्याला अन्न देणे म्हणजे मानवतेची सेवा या विचाराला कृतीत उतरवत नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी महाप्रसादाच्या आयोजनापुरते स्वतःला मर्यादित न ठेवता प्रत्यक्ष उपस्थित राहून भाविकांना अन्न वाढले. नवरात्रोत्सव, दत्त जयंती, ईद-ए-मिलादुन्नबी, गणेश विसर्जन, सरकार सोना पीर बाबा उरूस तसेच शहरातील विविध यात्रा व धार्मिक उत्सवांच्या काळात भाविकांसाठी पिण्याचे पाणी, महाप्रसाद, उपवासासाठी खिचडी यांसारखे विविध सेवाभावी उपक्रम दोसानी यांच्या माध्यमातून सातत्याने राबविले जातात. माहूरच्या यात्रांमध्ये अनेक ठिकाणी महाप्रसादाचे आयोजन केले जाते; मात्र सेवा केवळ बोलण्यात नको, ती प्रत्यक्ष कृतीत दिसली पाहिजे या भावनेतून दोसानी स्वतः भाविकांमध्ये मिसळून अन्नदान करतात. त्यांच्या या आपुलकीच्या सेवेमुळे भाविकांकडूनही समाधान व्यक्त करण्यात आले. स्वर्गीय आ.प्रदीप नाईक यांच्या स्मृतींना अन्नदानातून मानवतेची आदरांजली वाहण्याचा हा उपक्रम ठरला. भाविकांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा या भावनेतून नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांचे सेवाकार्य अविरत सुरू आहे. यावेळी उपनगराध्यक्ष नाना भाऊ लाड, नगरपालिकेचे अकाउंटंट मरेवाड, ओ.एस. गजलवाड, नगरसेविका प्रतिनिधी आकाश कांबळे, अफसर अली, विशाल ढोरे, सुमित खडसे, पत्रकार गजानन भारती, बालाजी कोंडे, राजू ठाकूर, निलेश बनसोडे, रफिक भाई, गणेश जाधव, सुनील आडे, विजय शिंदे, विकास राठोड, चेतन जाधव आदी उपस्थित होते.

# मुक्रमाबाद पोलिस ठाण्यावर मनुष्यबळाचा ताण

## २३ कर्मचाऱ्यांवर ६० गावांच्या सुरक्षेची जबाबदारी;रिक्त पदे तातडीने भरण्याची मागणी

मुखेड/प्रतिनिधी- तालुक्यातील मुक्रमाबाद पोलिस ठाण्यांतर्गत मोठ्या भौगोलिक क्षेत्राचा समावेश असताना पोलिस कर्मचाऱ्यांची अपुरी संख्या ही गंभीर समस्या बनली आहे. मंजूर पदांपैकी तब्बल पदे रिक्त असून, सध्या केवळ २३ पोलिस कर्मचारी कार्यरत असल्याने उपलब्ध मनुष्यबळावर कामाचा मोठा ताण पडत आहे.

मुक्रमाबाद परिसरात सुमारे ५५ ते ६० गावे, वाड्या-वस्त्या व तांड्यांचा समावेश होतो. शिवाय हा भाग कर्नाटक व तेलंगणा राज्यांच्या सीमेजवळ असल्याने विविध प्रकारच्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी पोलिसांना सतत दक्ष राहावे लागते. मात्र, अपुऱ्या मनुष्यबळामुळे कायदा व सुव्यवस्था राखण्याबरोबरच गुन्ह्यांचा तपास, तक्रारींचा निपटारा आणि बंदोबस्ताची कामे करताना कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त ताण येत आहे. पोलिस ठाण्यात कर्मचारी संख्या कमी असल्याने परिसरातील वाढत्या गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवणे तसेच नागरिकांच्या तक्रारींचे वेळेत निराकरण करणे आव्हानात्मक ठरत आहे. एखाद्या ठिकाणी बंदोबस्ताची गरज निर्माण झाल्यास उपलब्ध कर्मचाऱ्यांची मोठी कसरत होत असल्याचे चित्र आहे.मंजूर पदांच्या तुलनेत मोठ्या प्रमाणात पदे रिक्त असल्याने पोलिस यंत्रणेवरील कामाचा भार वाढला आहे. त्यामुळे रिक्त असलेली सर्व ३७ पदे तातडीने भरावीत, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे. मनुष्यबळ वाढल्यास पोलिसांना गावागावात प्रभावी गस्त घालणे, गुन्ह्यांचा तपास जलदगतीने करणे आणि नागरिकांना अधिक चांगली सुरक्षा देणे शक्य होणार आहे.

## खंजर बाळगणाऱ्या इसमास अटक

नांदेड/प्रतिनिधी- शहरातील वसरणी परिसरात खंजर घेवून फिरणाऱ्या एका इसमास शुक्रवारी रात्री नांदेड ग्रामीण पोलीसांनी अटक केली आहे. संजुसिंग राजेंद्रसिंग बावरी (वय ३५) रा.वसरणी, नांदेड हा इसम एखादा गंभीर गुन्हा करण्याच्या उद्देशाने खंजर घेवून फिरत असतांना शुक्रवारी रात्री नांदेड ग्रामीण पोलीसांनी अटक केली. त्याच्या जवळून दोन खंजर पोलीसांनी जप्त केले. याप्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात बावरी याच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# भारतीय बहुभाषिक ब्राह्मण महासंघ नांदेडची जिल्हा कार्यकारिणी जाहीर

नांदेड/प्रतिनिधी- ब्राह्मण समाजाच्या हितासाठी भारतीय बहुभाषिक ब्राह्मण महासंघ नांदेड जिल्ह्यात अग्रेसर झाला असून नुकतीच सीताराम मंदिर चिखलवाडी नांदेड येथे सभा होऊन त्यात जिल्हा कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली.

या सभेच्या अध्यक्षस्थानी गोविंदराव चौधरी यांची उपस्थिती होती तर प्रमुख अतिथी म्हणून नांदेड येथील प्रख्यात उद्योजक नारायणराव तुपेकर, तसेच परशुराम बचत गटाचे अध्यक्ष श्रीकांत कुलकर्णी, विधीतज्ज्ञ ॲड. प्रवीण आयाचित आणि जीवनराव शेवाळकर आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी मागील सभेचा वृत्तांत बंडोपंत कुंटूरकर यांनी वाचून दाखविला. त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. यावेळी नांदेड जिल्ह्यातील भारतीय बहुभाषिक ब्राह्मण महासंघाच्या जिल्हा कार्यकारिणीची निवड करण्यात आली. त्यात कार्याध्यक्ष प्रा. रमाकांत जोशी चिखलीकर, अध्यक्ष बंडोपंत कुंटूरकर, उपाध्यक्ष सखाराम कुलकर्णी व गोविंदराव चौधरी, रघुनाथ सरदेशपांडे, सचिव कमलाकर जोशी खळीकर, सहसचिव-दत्तात्रय पारखे, कोषाध्यक्ष श्रीनिवास देशपांडे, सहकोषाध्यक्ष जगदीश कुंटूरकर, संघटक जीवनराव शेवाळकर, नीरज अवस्थी, सदस्य गौतम सुरेश बिंदू, प्रसाद देशपांडे, ओमकार लव्हेकर, विनायक पाटील, भीमराव श्रीमंत, विजय पाठक, प्रसिद्धीप्रमुख कृष्णा उमरीकर, रमाकांत घणशीकर, सखाराम कुलकर्णी, कायदेशीर सल्लागार ॲड. सावित्री जोशी, गजानन पिंपळखडे, रमेश राजूरकर, प्रवीण आयाचित या मान्यवरांची जिल्हा कार्यकारिणीत निवड करण्यात आली आहे.

# सायाळ येथे साजरी झाली महिलांच्या पुढाकारातून अण्णाभाऊ साठे जयंती



भोकर/प्रतिनिधी- साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती सायाळ ता. भोकर येथे २८ ऑगस्ट रोजी महिलांच्या पुढाकारातून साजरी करण्यात आली.

साठे जयंती निमित्त सकाळी १० वाजता सरपंच सौ.अंजनाबाई फुगले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले त्यानंतर झालेल्या सभेत संपादक उत्तमराव बाबळे मराठी पत्रकार संघाचे जिल्हा उपाध्यक्ष बी.आर.पांचाळ, बाळा टिकेकर, केरबा देवकांबळे पत्रकार अनिल डोईफोडे, सुरेश पा.डूरे सुमेश फुगले आदींनी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याविषयी विचार मांडून युवकांनी अण्णाभाऊ साठेंचे साहित्य वाचन करावे मुलींनी मुलांनी शिक्षणाकडे अधिक भर द्यावा जयंतीच्या निमित्ताने साठेंचे विचार मनात रुजवावे असे विचार मांडले सुरेश पा.डुरे यांनी वाचनालयासाठी जागा देण्याचे जाहीर केले या कार्यक्रमास जयवंतराव साखरे, ग्रा.प. सदस्य विनायक हजापुरे, माधव पा. डुरे, देवराव पा. डुरे, आनंदा सावंत, जितेंद्र सावंत आदींची उपस्थिती होती. प्रास्ताविक अक्षय गव्हाळे यांनी केले. सूत्रसंचालन साई डाउनलोड यांनी केले तर आभार ग्रा.प.सदस्य शिवाजी गायकवाड यांनी मानले जयंती मंडळाच्या सर्व महिला कार्यकारिणी उपस्थित होत्या.

# तीन भामट्यांनी ज्येष्ठ नागरिकाला सव्वा दोन लाखाला फसविले

नांदेड/प्रतिनिधी-एटीएम सेंटरमध्ये पैसे काढण्यासाठी आलेल्या एका ७२ वर्षीय वृद्धाला संवादात गुंतवून भामट्यांनी त्यांचे एटीएम कार्ड हातचालाखीने बदलले आणि तब्बल २ लाख २३ हजार रुपये परस्पर काढून फसवणूक केल्याची घटना गुरुवारी सकाळी वर्कशॉप कॉर्नर येथील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या एटीएम सेंटरवर घडली. या प्रकरणी सुदर्शन ऐनलोड (वय ७२, ता.धर्माबाद) यांनी दिलेल्या तक्रारीवरुन भाग्यनगर पोलीस ठाण्यात तीन अनोळखी इसमांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

धर्माबाद तालुक्यातील सम्राळा येथील रहिवासी असलेले सुदर्शन ऐनलोड हे तीन आठवड्यांपूर्वी सकाळी वर्कशॉप कॉर्नर परिसरातील एस.बी.आय. च्या एटीएम सेंटरमध्ये पैसे काढण्यासाठी गेले होते. त्यावेळी तेथे उपस्थित असलेल्या तीन अज्ञात भामट्यांनी आपसात संगनमत करुन ऐनलोड यांना बोलण्यात गुंतवले. या गोंधळाचा फायदा घेत आरोपींनी अत्यंत चाणाक्षपणे ऐनलोड यांचे मूळ एटीएम कार्ड बदलून भलतेच कार्ड त्यांच्या हाती टेकवले. त्यानंतर आरोपींनी वेगवेगळ्या एटीएम सेंटरवरुन या कार्डचा वापर करत ऐनलोड यांच्या खात्यातून तब्बल २ लाख २३ हजार रुपये काढून पळ काढला. दरम्यान, आपल्या खात्यातून मोठी रक्कम काढण्यात आल्याचे लक्षात आल्यानंतर आपली फसवणूक झाल्याचे ऐनलोड यांच्या लक्षात आले. त्यांनी भाग्यनगर पोलीस ठाणे गाठून फिर्याद दिली. या तक्रारीवरुन पोलीसांनी तीन अज्ञात आरोपींविरुध्द गुन्हा नोंदवला असून, सहाय्यक पोलीस निरीक्षक महाजन या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# नांदेड-मुंबई राज्य-राणी एक्सप्रेसला ठाणे,दादरला थांबे देण्याची मागणी

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड ते मुंबई एक्सप्रेस रेल्वे गाडी मागील कित्येक वर्षापासून धावते. परंतु आजपर्यंत या गाडीला ठाणे आणि दादरला थांबे नसल्यमुळे ते देण्याची मागणी दि.२७ ऑगस्ट रोजी निवेदनाद्वारे येथील ज्येष्ठ नागरिक डॉ. एस.एस. जाधव यांनी संबंधिताकडे केली आहे.

मुंबई महानगरमध्ये ठाणे व दादर ही महत्त्वाची रेल्वे स्टेशन आहेत. या दोन्ही रेल्वे स्टेशनला नांदेडहून येणाऱ्या जाणाऱ्या प्रवाशाची प्रचंड गर्दी असते. छत्रपती टर्मिनल मुंबई व कल्याण ठिकाणीच या गाडीला थांबे आहेत.परंतु नांदेड -मुंबई-नांदेड राज्य -राणी एक्सप्रेस गाडी संख्या क्र.१७६११/१२ अजून पर्यंत थांबा मंजूर नसल्यामुळे प्रवाशी व त्यांच्या कुटुंबीयांची प्रचंड हेळसांड प्रचंड होत आहे. विशेष म्हणजे रेल्वे खात्याचे दुटप्पी धोरण असून देवगिरी एक्सप्रेस, नंदिग्राम एक्सप्रेस रेल्वे गाड्यांना ठाणे आणि दादर स्टेशनला सुरुवातीपासूनच थांबे मंजूर आहेत. मग राज्य-राणी एक्सप्रेसला थांबे मंजूर का नाहीत? असा प्रश्न प्रवाशांमधून उपस्थित केला जात आहे. या गाडीला थांबे मिळून देण्यासाठी नांदेडचे खा. अशोकराव चव्हाण, खा. अजितदादा गोपछेडे यांनी आपल्या विशेष प्रयत्नातून वरील दोन्ही ठिकाणी थांबे मंजूर करून देण्याची मागणी डॉ. एस.एस.जाधव यांनी केली आहे. रेल्वे थांब्याच्या मागण्याचे निवेदन विभागीय रेल्वे प्रबंधक नांदेड, जनरल रेल्वे मॅनेजर सिकंदराबाद जनरल रेल्वे मॅनेजर सेंटर रेल्वे मुंबई व रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना देण्यात आल्या आहेत.

# राष्ट्रीय क्रीडा दिन व शिक्षक दिनानिमित्त ऑनलाइन व्याख्यानमाला

नांदेड/प्रतिनिधी-स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र संकुलाच्या वतीने राष्ट्रीय क्रीडा दिन आणि शिक्षक दिनानिमित्त विशेष ऑनलाइन व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. ही व्याख्यानमाला दि.२९ ऑगस्ट ते ५ सप्टेंबर या कालावधीत दररोज स.११ ते १२.३० या वेळेत आयोजित करण्यात आली आहे.

या व्याख्यानमालेत योग, शारीरिक तंदुरुस्ती, आरोग्य, शिक्षक शिक्षण, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, भारतीय ज्ञान प्रणाली, क्रीडा धोरण आणि शिक्षण क्षेत्रातील विविध समकालीन विषयांवर देशातील नामवंत तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. दि.३० रोजी डॉ. दादासाहेब धेंगले, पुणे विद्यापीठ हे शारीरिक तंदुरुस्ती व आरोग्य या विषयावर मार्गदर्शन करतील. दि.३१ रोजी डॉ. सुमन पांडे, पुणे विद्यापीठ यांचे सवय, आहार आणि आरोग्य या विषयावर व्याख्यान होणार आहे. दि.१ सप्टेंबर रोजी डॉ. अश्विनी करवांडे, मुंबई विद्यापीठ या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि शिक्षक शिक्षण या विषयावर मार्गदर्शन करतील.तसेच दि.२ सप्टेंबर रोजी डॉ. रमेश प्रसाद पाठक, दिल्ली यांचे शिक्षणातील स्वदेशी ज्ञानप्रणाली, दि.३ सप्टेंबर रोजी डॉ. दीपक साबळे, प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नंदुरबार यांचे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि शालेय शिक्षण, दि.४ सप्टेंबर रोजी डॉ. पियुष जैन, अध्यक्ष, पीईएफआय यांचे विकसित भारतासाठी क्रीडा धोरण आणि दि.५ सप्टेंबर रोजी डॉ. डी. एन. मोरे, प्राध्यापक, पीपल्स कॉलेज, नांदेड यांचे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० समोरील आव्हाने या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

# जिल्हा कारागृहात रक्षाबंधनाचा अनोखा उपक्रम



नांदेड/प्रतिनिधी- स्वराज्य जननी वस्तीस्तर संघ संस्थेच्या अध्यक्षा अनुराधा गणेश मठपती यांच्या वतीने जिल्हा कारागृह, नांदेड येथे रक्षाबंधनाचा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला.

रक्षाबंधनाच्या निमित्ताने कारागृहातील बांधवांना राखी बांधून त्यांच्या सुख-समृद्धीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या उपक्रमातून प्रेम, आपुलकी, बंधुभाव आणि सामाजिक एकात्मतेचा संदेश देण्यात आला. कारागृहातील बांधवांनाही रक्षाबंधनाच्या या उपक्रमामुळे आपुलकीची भावना अनुभवता आली. समाजातील कोणताही घटक प्रेम व माणुसकीपासून वंचित राहू नये, या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आल्याचे अनुराधा मठपती यांनी सांगितले. यावेळी स्वराज्य जननी वस्तीस्तर संघ संस्थेच्या सचिव अश्विनी स्वामी तसेच आनंदी धनगिरे, रचना घोंगडे, सुरेखा वाळके, नागोराव वाळके आदी सदस्यांची उपस्थिती होती. सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हा कारागृह अधीक्षक संपत आडे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच प्रशासनाच्या सहकार्याने कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# बुरखा ओढून महिलेशी झटापट;आरोपी पोलिसांच्या ताब्यात

किनवट/प्रतिनिधी- बोधडीवरून दहेगाव येथे आपल्या पत्नीसह परतणाऱ्या एका तरुणाला विनाकारण शिवीगाळ करत धार्मिक भावना दुखावणे तसेच त्याच्या गरोदर पत्नीचा बुरखा ओढून तिला जखमी केल्या प्रकरणी किनवट पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना शुक्रवारी, २८ ऑगस्ट रोजी रात्री आठ वाजेच्या सुमारास घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, दहेगाव येथील रहिवासी शेख युसुफ शेख रशीद (वय २३) हे त्यांच्या पत्नीसह बोधडी येथे नातेवाईकांकडे कार्यक्रमासाठी गेले होते. कार्यक्रम आटोपून रात्री आठच्या सुमारास दोघेही स्कुटीने (क्र.एम.एच.२६-बी.एफ.-०५९१) दहेगावाकडे परतत होते. बोधडी येथील जिल्हा परिषद शाळेजवळ आले असता, पाठीमागून आलेल्या एका अज्ञात दुचाकीस्वाराने त्यांच्या गाडीमागे गाडी लावून विनाकारण धार्मिक तेढ निर्माण करतील असे शब्द वापरून शिवीगाळ करण्यास सुरुवात केली.दरम्यान तक्रारदाराने विरोध केल्यानंतर आरोपीने पुढे जाऊन चिंचोली तांड्याकडे जाणाऱ्या रस्त्याजवळ त्यांची गाडी अडवली. त्यानंतर आरोपीने तक्रारदाराच्या पत्नीचा बुरखा ओढून वाईट उद्देशाने तिचा डावा हात पकडला. या झटापटीत तक्रारदाराची पत्नी रस्त्यावरील खड्ड्यात पडून जखमी झाल्याचे तक्रारकर्त्यांचे म्हणणे आहे. घटनेनंतर आरोपीने घटनास्थळावरून पळ काढण्याचा प्रयत्न केला. तक्रारदाराने आपल्या मित्रांना माहिती दिल्यानंतर गोकुळनगर येथील शिवबाबा शाळेसमोर आरोपीस रोखण्यात आले, जिथे तो स्वतः दुचाकीवरून खाली पडला. माहिती मिळताच किनवट पोलीस ठाण्याच्या डायल ११२ पथकाने तात्काळ घटनास्थळी पोहोचून आरोपीला ताब्यात घेतले.जखमी गरोदर महिलेवर गोकुंदा येथील सरकारी दवाखान्यात प्राथमिक उपचार करण्यात आले. परंतु, डोक्याला मार लागल्याने व पोटात दुखू लागल्याने तिला पुढील उपचारासाठी रेफर करण्यात आले. याप्रकरणी पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव प्रदीप श्रीराम केंद्रे (वय ३२, रा. गंगानगर, किनवट) असल्याचे सूत्रांनी सांगितले. पीडित पतीच्या तक्रारीवरून किनवट पोलिसांनी आरोपी प्रदीप केंद्रे याच्याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक गणेश व्यंकटराव कराड हे करत असल्याचे सांगितले.

# राष्ट्रवादीच्या नव्या प्रवक्त्यांची घोषणा

## रोहित पवारांच्या गैरहजेरीने चर्चेला उधाण

मुंबई/प्रतिनिधी-राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरदचंद्र पवार) नव्या दहा प्रवक्त्यांची यादी शनिवारी जाहीर करण्यात आली. अनुभवी जितेंद्र आव्हाड यांच्यासह अनिश गवांदे, महेबूब शेख, हेमाताई पिंपळे यांच्यासह दहा जणांवर पक्षाची भूमिका माध्यमे आणि जनतेसमोर मांडण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

शरदचंद्र पवार यांच्या नेतृत्वाखालील पक्षाच्या कोअर कमिटीची बैठक मुंबईत झाली. या बैठकीत पक्ष संघटना आणि विविध राजकीय विषयांवर चर्चा करण्यात आली. सुप्रिया सुळे, शशिकांत शिंदे, जयंत पाटील, अनिल देशमुख, हर्षवर्धन पाटील, जितेंद्र आव्हाड, राजेश टोपे, अमोल कोल्हे, निलेश लंके यांच्यासह प्रमुख नेते उपस्थित होते.नव्या प्रवक्त्यांमध्ये जितेंद्र आव्हाड, क्लाईड क्रास्टो, भीमराव हत्तीअंबीरे, अनिश गवांदे, ॲड. फैजल मिर्झा, महेबूब इब्राहीम शेख, प्रवीण कुंटे पाटील, प्रशांत सोनबा वीरकर, ॲड. हेमाताई पिंपळे आणि डॉ. चंद्रकांत बारेला यांचा समावेश आहे.दरम्यान, आमदार रोहित पवार या महत्त्वाच्या बैठकीला अनुपस्थित राहिल्याने पक्षांतर्गत चर्चेला उधाण आले आहे. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्या काँग्रेस प्रवेशाच्या चर्चांना वेग आला आहे. पुणे दौऱ्यात राहुल गांधी यांच्या स्वागतासाठी रोहित पवार यांच्या समर्थकांकडून लावण्यात आलेल्या फलकांमुळेही या चर्चांना बळ मिळाले होते.

# देगलूरमध्ये चोरट्यांचा धुमाकूळ; दिव्यांगाचा मोबाईल हिसकावला

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर शहरात चोरी व मोबाईल हिसकावण्याच्या घटनांत वाढ होत असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आठवडे बाजार, मुख्य बाजारपेठ व सराफा लाईन परिसरात गर्दीचा फायदा घेत चोरटे सक्रिय असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे बाजारपेठेत खरेदीसाठी येणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

काही दिवसांपूर्वी दुकानफोडीच्या घटना घडल्यानंतर आता भरदिवसा एका दिव्यांग व्यक्तीचा मोबाईल हिसकावण्यात आल्याने पोलिसांच्या गस्तीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. गर्दीच्या ठिकाणी चोरटे निर्भयपणे वावरत असल्याची भावना नागरिकांत निर्माण झाली आहे.विशेषतःमहिला,ज्येष्ठ नागरिक व दिव्यांगांना लक्ष्य केले जात असल्याने पोलिसांनी संशयितांवर करडी नजर ठेवून नियमित पायी गस्त वाढवावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे. तसेच सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून संशयितांचा शोध घेऊन चोरीच्या घटनांना आळा घालण्याची गरज आहे.आगामी सणांच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठेत गर्दी वाढणार असल्याने पोलिसांनी प्रतिबंधात्मक उपाययोजना करून चोरट्यांचा बंदोबस्त करावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. नागरिकांनीही गर्दीच्या ठिकाणी मोबाईल व मौल्यवान वस्तूंची काळजी घ्यावी. मात्र, केवळ नागरिकांना सतर्कतेचे आवाहन न करता पोलिसांनी प्रभावी गस्त व तातडीची कारवाई करून शहरातील कायदा-सुव्यवस्थेबाबत नागरिकांचा विश्वास कायम ठेवावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# नगराध्यक्ष प्रेरणाताई कोटलावार यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

कुंडलवाडी/प्रतिनिधी-नगरपालिकेच्या नगराध्यक्षा सौ. प्रेरणाताई गजानन कोटलावार यांच्या वाढदिवसानिमित्त नागरिक, नगरसेवक व के. रामलू प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने अभिष्टचिंतन सोहळा उत्साहात संपन्न झाला.

नगराध्यक्ष सौ.प्रेरणा कोटलवार यांच्या वाढदिवसानिमित्त दिवसभर विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. श्रीकृष्ण गोशाळेत गोमाता पूजन व सेवा करून फळवाटप करण्यात आले. ईदगाह परिसरात वृक्षारोपण, प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्णांना फळवाटप तसेच जिल्हा परिषद हायस्कूलमधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. कुंडलेश्वर मंदिरात दर्शन घेऊन महाआरती करण्यात आली. सायंकाळी झालेल्या अभिष्टचिंतन सोहळ्यास भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष हावगीरराव गोपछडे, गजानन कोटलावार, चक्रेश पाटील बनाळीकर, सौ. संगीता मेरगेवार, सौ. अर्चना शिंदे, सौ. अंजू दाचावर, माजी नगराध्यक्ष भुमण्णा ठक्कूरवार, सपोनि ज्ञानेश्वर शिंदे, पीएसआय गजेंद्र मांजरमकर, शैलेश त्याकावार, रमेश ईरलावार यांच्यासह सर्वपक्षीय पदाधिकारी, नगरसेवक, महिला व नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. नरेश बोधनकर यांनी केले.



# मुदखेड पंचायत समितीत काही ग्रामसेवकांना गावच मिळेनात

मुदखेड/प्रतिनिधी-मुदखेड तालुका हा ५० ग्रामपंचायत असून अंदाजीत ४४ ग्रामसेवक पंचायत समितीमध्ये कार्यरत आहेत. अनेक ग्रामसेवकांना दोन ते तीन गावे देण्यात आले आहेत. त्यामुळे त्यांच्यावर कामाचा बोजा वाढला आहे. तर काही ग्रामसेवकांना मात्र ग्राम पंचायतीमध्ये नियुक्ती देण्यात आली नाही. ते फक्त पंचायत समितीला हजेरी लावून आपला पगार उचलत आहेत.

गेल्या दोन वर्षांपासून या पंचायत समितीवर प्रशासक असल्यामुळे अधिकाऱ्यांचा मनमानी कारभार चालला असल्याच्या भावना अनेकांनी बोलून दाखवीले आहेत. ग्रामपंचायत विभाग असलेले अधिकारी व कर्मचारी यांचा मनमानी कारभार सुरू झाला आहे. कोणत्याही ग्रामसेवकांना कोणतेही गाव द्यायचे व त्यांच्याकडून गाव काढून घेऊन दुसऱ्यांना गाव द्यायचे असा प्रकार सुरू आहे गेल्या अनेक वर्षापासून या पंचायत समितीत काही ग्रामसेवकांना गावेच दिले जात नाहीत अशा तक्रारी करण्यात आल्या आहेत. तर काही मर्जीतल्या ग्रामसेवकांना दोन गावे किंवा तीन गावांचा कारभार देण्यात आला. तीन गावांचा कारभार संबंधीत ग्रामपंचायत अधिकाऱ्यांकडे असल्याने सर्वसामान्य नागरिकांची कामे प्रलंबित राहत आहेत. संबंधितांनी याकडे लक्ष देऊन हा मनमानी कारभार थांबवा व एका ग्रामसेवकांना एकच गाव देऊन समान हक्क देण्यात यावे अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

# चेन्नापुरात मीटर फोडून विजेची चोरी;दोघांविरुद्ध पोलीस कारवाई

नांदेड/प्रतिनिधी-अर्धापूर तालुक्यातील मौजे चेन्नापूर येथे दोन वीज ग्राहकांनी विजेचे मीटर फोडून वीज चोरी केल्याचे महावितरणच्या तपासणीत आढळून आले. त्याप्रकरणी देण्यात आलेल्या तक्रारीनुसार नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२५ ऑगस्ट रोजी सहायक अभियंता संतोष सोनकांबळे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार चेन्नापूर येथील रहिवाशी सिताबाई संभाजी तहाडे यानी विजेचे मीटर फोडून १०१३५ रुपये व व्यंकटी बालाजी बोरकर यांनी ८६०८ रुपयांची वीज चोरी केली. त्याप्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात भारतीय विद्युत कायदा १३५ नुसार दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे.

# राष्ट्रसंत भगवानबाबांच्या १३० व्या जयंतीनिमित्त प्रबोधनाचा जागर

किनवट/प्रतिनिधी-१ सप्टेंबर हा समाज सुधारक राष्ट्रसंत भगवानबाबांच्या जन्मोत्सवाचा सुवर्ण दिवस. त्या औचित्यावर प्रधानसांगवी (दूधगाव) येथील संत भगवानबाबा विद्यालयात १३० वा जन्मोत्सव सोहळा आयोजित केला आहे. समाजबांधवांसह तमाम भक्तांनी उपस्थित राहून सोहळा द्विगुणित करावा, असे संयोजकांच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.

राष्ट्रसंत भगवानबाबांच्या विचारांचा दीप प्रज्वलित करून त्यांच्या जीवनमुल्यांचा ठेवा आपल्या जीवनात साकारण्यासाठी म्हणून १ सप्टेंबर हा सुवर्ण दिवस प्रेरणास्रोत मानला जातो, अशा थोर महात्म्याच्या थोरवीचा १३० वर्षाचा हा अखंड डोळस इतिहास साक्षी आहे. या दीपस्तंभाचा आदर्श आजच्या तरुणाई समोर तेवता ठेवण्यासाठी त्या अनुषंगाने मान्यवरांचे प्रबोधन सुद्धा तेवढेच महत्त्वाचे ठरणार असल्याने, तमामांनी जन्मोत्सवाला उपस्थित राहून सोहळा द्विगुणित करणे काळाची गरज बनली आहे. १ सप्टेंबर रोजी दु.१ वाजता श्रीसंत भगवानबाबांच्या प्रतिमेचे पूजन. तदोपरांत श्रीसंत भगवानबाबांच्या जीवन चरित्रावर मान्यवरांचे परखड व मौलिक प्रबोधन. शेवटी वृक्षारोपणाच्या उपक्रमाने जन्मोत्सव सोहळ्याची सांगता होणार असून सर्वांची उपस्थिती अभिप्रेत असल्याचे संयोजकांच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# गृहमंत्री अमित शाह-उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात चर्चा

## राजकीय वर्तुळात चर्चांना उधान

मुंबई/प्रतिनिधी- मुंबई महापालिकेच्या महापौरपदाचा संभाव्य फॉर्म्युला आणि शिवसेनेतील असंतोषाच्या पार्श्वभूमीवर शाह आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात विमानतळावर झालेल्या दहा मिनिटांच्या गुप्त चर्चेमुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधान आले आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या मुंबई दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर महायुतीतील अंतर्गत राजकारण पुन्हा चर्चेत आले आहे. अमित शाह यांच्या स्वागतासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, एकनाथ शिंदे यांच्यासह महायुतीतील प्रमुख नेते विमानतळावर उपस्थित होते. याचवेळी शाह आणि शिंदे यांच्यात खासगीत चर्चा झाली. राज्यातील राजकीय घडामोडी तसेच शिवसेनेतील मंत्र्यांच्या असंतोषावर दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. शाह यांनी शिंदे यांना चिंता करू नका असा दिलासा दिल्याचेही सूत्रांचे म्हणणे आहे.

# पोस्टातील आधार केंद्र सुरु करण्यासाठी शिवसेनेचे 'बोंब मारो' आंदोलन

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर येथील पोस्ट ऑफिस मधील आधार कार्ड नोंदणी केंद्र गेल्या चार महिन्यापासून बंद असल्याने नागरिकांची हेळसांड होत असल्याने सदरील केंद्र चालू करण्याच्या मागणीसाठी देगलूर येथील पोस्ट समोर शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली बोंबाबोंब बोंब मारो आंदोलन व निदर्शने करण्यात आले.

देगलूर तालुक्यातील एकमेव चालू असलेल्या आधार केंद्र मागील चार महिन्यापासून बंद असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे. सदरील आधार केंद्र चालू करावे. या मागणीसाठी शिवसेनेच्यावतीने २८ ऑगस्ट रोजी रक्षाबंधन सणाचे औचित्य साधून पोस्ट ऑफिस समोर निदर्शने व बोंबाबोंब बोंब मारो आंदोलन करण्यात आले. यावेळी आधार केंद्र त्वरित चालू करण्याच्या घोषणा देण्यात आल्या. शैक्षणिक व इतर शासकीय कामासाठी आधार कार्ड बंधनकारक असल्याने आधार कार्ड नोंदणी करण्यासाठी लहान बालके, वृद्ध, स्त्री, पुरुषांना सकाळी पाच वाजेपासून सर्व काम धंदा सोडून भूकतान विसरून लाईन मध्ये उभे राहावे लागत होते. पण तेही एकमेव आधार केंद्र मागील चार महिन्यापासून बंद असल्याने शैक्षणिक व शासकीय कामासाठी आधार नोंदणी करण्यासाठी नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे बंद असलेले एकमेव आधार कार्ड नोंदणी केंद्र त्वरित चालू करण्यात यावी अशी मागणी शिवसेनेच्यावतीने करण्यात आली. या आंदोलनात शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील, पांडुरंग पाटील थडके देगावकर, भगवान जाधव, नागनाथ वाडेकर, उमेश पा.आडलूरकर, मशनरी पैलावार, विनोद सोनकांबळे, अशोक कांबळे, मानाजी लोणे, गंगाधर पाटील चाकूरकर, राजीव उल्लेवार, हणमंत राजुरे, संजय पाटील मंगरूळे, अर्जुन लुटे, राजू जाधव, शिवाजी चव्हाण, शंकरराव जाधव, आदीसह इतर पदाधिकारी व इस्त्री पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरुन

### मनोज जरांगे पाटलांच्या...

व आर्थिक मदत देण्याची मागणीही त्यांनी केली. मागण्या मान्य करून पुन्हा आंदोलनाची वेळ आणू नये, असे आवाहन करत गाफील राहिल्यास दगाफटका होऊ शकतो, असा इशाराही जरांगे यांनी दिला.

### नांदेडचे भूमीपुत्र...

पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. गंगलवाड हे हिंगोली पोलीस नियंत्रण कक्षात कार्यरत होते. दोन महिन्यांपूर्वीच त्यांची परभणी पोलीस दलातून हिंगोलीत बदली झाली होती. मनमिळाऊ व कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून त्यांची ओळख होती. घटनास्थळी कोणतीही चिठ्ठी आढळली नसून आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

### ज्योतिबा खराटेंच्या वाढदिवशी...

नितीन चंदनशिवे यांच्या प्रबोधनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. या कार्यक्रमाचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन आयोजन समितीच्यावतीने स्वीकृत नगरसेवक तथा शहरप्रमुख प्रशांत कोरडे, शिवसेनेचे तालुकाप्रमुख मारोती दिवशे, युवासेनेचे तालुकाप्रमुख अतुल दर्शनवाड, माजी शहरप्रमुख संतोष यलचलवार, शहर संघटक किशोर बोलेनवार यांनी केले आहे.

### आदिवासींचे रिक्त पदे...

व्यवस्था बंद करावी, अशा मागण्या केल्या आहेत. दरम्यान, शासनाकडून लेखी आश्वासन मिळाल्यानंतरच आंदोलन मागे घेण्याची भूमिका विद्यार्थ्यांनी घेतली आहे.

### अल्पवयीन मुलीवर बलात्कार करणाऱ्या...

अंतर्गत कारवाई करावी. तसेच अल्पवयीन मुलीवरील अत्याचाराचे प्रकरण हे जलदगती न्यायालयात चालवावे अशी मागणी एमआयएम पक्षाच्यावतीने करण्यात आली आहे. यावेळी माजी उपमहापौर अब्दुल शमीम, नगरसेवक मोहम्मद अलताफ हुसेन, रहिमखान, मो.सोहेल, बेबी साहिस्ता, सय्यद मुजीब यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# नरसी फाट्यावर गुटखा विक्रीला वेग;पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह?

नायगाव/प्रतिनिधी-नरसी फाटा व परिसरात प्रतिबंधित गुटख्याची विक्री जोमाने सुरू असल्याची चर्चा आहे. गुटखा पुरवठा करणारे चार एजंट सक्रिय असल्याची माहिती पुढे येत असून, त्यांच्या माध्यमातून परिसरातील विविध विक्रेत्यांना गुटख्याचा पुरवठा होत असल्याचे बोलले जात



आहे. या विक्रेत्यांची व पुरवठादारांची माहिती संबंधित यंत्रणांना असल्याचा दावा नागरिकांकडून करण्यात येत आहे.रामतीर्थ पोलिसांना विक्रेते व पुरवठादारांची माहिती असूनही ठोस कारवाई होत नसल्याने पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आर्थिक हितसंबंधांमुळे या अवैध व्यवसायाला अप्रत्यक्ष मूकसंमती मिळत असल्याचा आरोपही नागरिकांकडून केला जात आहे. प्रतिबंधित गुटख्याच्या विक्रीला आळा घालण्यासाठी केवळ किरकोळ विक्रेत्यांवर कारवाई न करता पुरवठ्याच्या मुळापर्यंत पोहोचून संबंधित एजंट व पुरवठादारांवर कठोर कारवाई करण्याची गरज आहे. या प्रकरणाची वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी चौकशी करून सत्य समोर आणावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# बारमध्ये ४ लाखाची चोरी

नांदेड/प्रतिनिधी-मौजे वाळकी ता.हदगाव येथे चोरट्यांनी एका बारमध्ये चोरी करुन जवळपास ४ लाख रुपयांचा ऐवज चोरुन नेल्याची घटना बुधवारी रात्री घडली आहे.

मौजे वाळकी येथे कयाधु बार ॲण्ड रेस्टारंट हे हॉटेल आहे. मंगळवारी रात्री हॉटेल मालकाने हॉटेल बंद करुन घरी गेले होते. अज्ञात चोरट्याने बार ॲण्ड रेस्टारंटच्या पाठीमागील दरवाजा तोडून आतमध्ये प्रवेश केला. हॉटेलमधील विदेशी दारु, रोख रक्कम, सीसीटीव्ही कॅमेरा, डीव्हीआर असा ३ लाख ८७ हजार रुपयांचा ऐवज चोरट्यांनी चोरुन नेला आहे. शिवाजी जिंतूरकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन हदगाव पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४